महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २१९ वा | दिनांक : २५/०६/२०२५ | वार : बुधवार

## ठाकरे गटाच्या कार्यपद्धतीवर भास्कर जाधव नाराज



**मुंबई :** जरा काही झाले तर वर जायचे, वर सुद्धा हल्ली काय उद्योग चालले आहे कळत नाही. एखादा निर्णय घेताना तिथल्या पदाधिकाऱ्यांना विचारले पाहिजे. तिथल्या जबाबदार नेत्याला प्रश्न विचारला पाहिजे. हा भारी वशीला हल्ली लागला आहे असे म्हणत उबाठाच्या कार्यशैलिवर उबाठाचे नेते भास्कर जाधव यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

भास्कर जाधव पुढे बोलताना म्हणाले की, वरती असलेल्या वशील्याचा माझ्यावर काही परिणाम होणार नाही. पक्षामध्ये कुठला नेता मला का टार्गेट करेल? का करेल, प्रत्येकाचे कार्यक्षेत्र ठरले आहे. पक्षातील नेत्यांच्या मनात माझ्याबद्दल नितांत आदर आहे.

भास्कर जाधव म्हणाले की, तालुका प्रमुख, विभाग प्रमुख मी केलेले काम. बाळासाहेबांच्या अष्टप्रधान मंडळामध्ये जे 13 नेते कार्यरत होते त्यातील सुभाष देसाई आजही कार्यरत असून पूर्णक्षमतेने काम करत आहेत. ते जेव्हा मला भेटतात तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद मला दिसतो. दिवाकर रावते यांच्यासारखा लढवय्या माणूस जेव्हा भेटतो तेव्हा ए भास्कर इकडे या असा आवाज देतात. तू चांगला बोलतोस असे म्हणत कौतुक करतात. माझा द्वेष करणार कोण? दुसरी गोष्ट माझा द्वेष कुणीही करत नाही, करत असेल तर त्याला मी किती किंमत देणार. किती द्यावी असे तुमचे म्हणणे आहे, मी काय आहे त्यांना माहिती आहे, ते काय मला माहिती आहे, असे म्हणत त्यांनी नाव न घेता विनायक राऊतांवर टीका केल्याचे बोलले जात आहे.

भास्कर जाधव म्हणाले की, मला पक्षातील कोणी नेता त्रास देत नाही आणि कुणी द्यायच्या भानगडीत पडू नये, हे पण सांगून टाकतो हे पूढचे बोलायला नको, असा इशाराच त्यांनी अप्रत्यक्षपणे राऊतांना दिल्याची चर्चा आहे. मी घुसमटणारा माणूस नाही. शरद पवारांना सोडण्याची राजकीय चूक केली हे मी नाकारणार नाही. माझी कुणीही घुसमट केली नाही. माझी शिवसेनेत घुसमट होते असे काही नाही. माझ्याकडे प्रामाणिक म्हणून पहा.

भास्कर जाधव म्हणाले की, शरद पवारांना सोडून चूक केल्याच्या विधानावर आमच्या पक्षातील काही जण टीका करत आहे. त्यांनी हे लक्षात घ्यावे की मी आदर्श ठेवला हे विचारात घेतले पाहिजे. मी कुठल्या पदाकरता यापूर्वीही अशी नौटंकी केली नाही, आणि करणार नाही. मी अधिवेशनावेळी सरकारला सांगितले की माझ्याऐवजी दुसऱ्या कुणाला विरोधी पक्षनेता करा. मी माझे पत्र मागे घेतो.

## १२०० फूट खोल दरीत आढळले तलाठी अन् तरुणीचे मृतदेह



**पुणे :** पुण्याच्या जुन्नरमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. १२०० फूट खोल दरीमध्ये २ मृतदेह आढळून आले आहेत. यामध्ये श्रीगोंद्याचे तलाठी आणि एका महाविद्यालयीन तरुणीचा मृतदेह समावेश आहे. जुन्नरच्या कोकणकडा परिसरातून दोघांनी आत्महत्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार श्रीगोंद्याचे तलाठी रामचंद्र साहेबराव पारधी, असे मृत व्यक्तीचे नाव आहे. रुपाली खुटाण आंबोली असे मृत महाविद्यालयीन तरूणीचे नाव आहे. जुन्नर पोलिस ठाण्याचे निरीक्षकांनी या घटनेची माहिती प्रसारमाध्यमांनी दिली.

जुन्नरच्या रिव्हर्स वॉटर फॉलजवळ एक पांढऱ्या रंगाची कार गेली काही दिवस उभी होती. रविवार २२ जून रोजी ही गोष्ट स्थानिकांना निदर्शनास आली तेव्हा त्यांनी शोधाशोध सुरू केली. यावेळी दरीच्या कड्यावर पुरुष आणि स्त्रीच्या चपला आढळून आल्या. यानंतर सोमवारी रेस्कू टीमने दरीत उतरुन शोध घेतला असता रुपाली आणि रामचंद्र यांचे मृतदेह आढळून आले. त्यानंतर जुन्नर पोलिस आणि रेस्क्यू टीमने कठिण परिस्थितीत मृतदेह दरीतून बाहेर काढले आहेत. यानंतर मृतदेह पोस्टमार्टमसाठी सरकारी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. रमेश आणि प्रियंका यांनी आत्महत्या केली, की त्यांचा खून करण्यात आला. याबाबतचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. पोस्टमार्टम रिपोर्टनंतर मृत्यूचे कारण समजणार आहे. पोलिसांकडून आजूबाजूला चौकशी केली जात आहे. मृत्यूचे कारण आणि दोघांमधील संबंध याबाबत सखोल चौकशी सुरू आहे.

दुसरीकडे नाशिकमध्ये चामारलेणी रोडवर नग्नावस्थेत मिळालेल्या मृतदेहाची ओळख पटवण्यात म्हसरुळ पोलिसांना यश आले. कर्नाटकमधील तरुण मरकुंडा उमेश अंबिकार (३४)असे या तरुणाचे नाव आहे. हा ट्रकचालक असून डिझेल संपल्याने ट्रक दिंडोरी रोडवर आरोग्य विज्ञान विद्यापीठाजवळ उभा केलेला मिळाला. या ट्रकच्या कॅबिनमध्ये रक्ताचे डाग मिळून आले असून या कॅबिनमध्येच त्याचा खून करून मृतदेह चामार लेणी रोडवर फेकून दिल्याचे तपासात निष्पन्न झाले.

संशयितांनी खून करून मृतदेह ब्लॅंकेटमध्ये गुंडाळून चामर लेणी रोडवर फेकून दिला. घटनास्थळापासून ५०० मीटर अंतरावर मृताची पॅन्ट मिळून आली. खुनाचा उद्देश लूट की अनैतिकसंबंध अथवा अन्य कारण हा तपास करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

## हिंदी भाषेबाबत अंतिम निर्णय सात दिवसात : त्रिभाषा सूत्राला राज्यभरातून विरोध



**मुंबई :** महाराष्ट्रातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा लागू करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला असून या निर्णयाला राज्यभरातून मोठा विरोध केला जात आहे. राज्यभरातून होणारा विरोध लक्षात घेता राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. हिंदी भाषेबाबतचा अंतिम निर्णय पुढील सात दिवसात घेतला जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे हे हिंदी भाषेला विरोध करणाऱ्या राजकीय पक्षांशी, नेत्यांशी तसेच भाषा तज्ज्ञांसोबत बैठक घेणार आहेत.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, इतर राज्यांची भाषा व त्यांचे धोरण, तसेच हिंदीबाबतचे धोरण या मुद्द्यांवर सरकारची भूमिका समजावून सांगणार आहेत. यासोबतच, या धोरणाला विरोध करणाऱ्यांची नेमकी भूमिका काय आहे, याचीही माहिती घेतली जाणार आहे. त्यानंतर या संपूर्ण बाबींचा समावेश असलेला एक समग्र अहवाल तयार करण्यात येईल, आणि त्यानुसार सरकार निर्णय घेईल, अशी माहिती मिळाली आहे.

त्रिभाषा सूत्रावर ठाम असलेल्या सरकारने आता थोडी मवाळ भूमिका घेतल्याचे दिसत आहे. या मुद्द्यावर सर्व राजकीय नेते आणि तज्ज्ञांशी सल्लामसलत करण्याची भूमिका सरकारने घेतली आहे. सोमवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी यासंदर्भात बैठक झाली. या बैठकीत साहित्यिक, भाषातज्ज्ञ, राजकीय नेते आणि संबंधितांशी चर्चा करूनच अंतिम निर्णय घेण्याचे ठरले आहे. नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत मराठी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासह विविध पर्यायांवर सर्वांसाठी समग्र सादरीकरण करण्यात येणार आहे.

हिंदी भाषा आणि त्रिभाषा सूत्रावरुन राज्य सरकारची नेमकी भूमिका काय आहे याची माहिती देण्यासाठी शिक्षणमंत्री दादा भुसे हे राज ठाकरेंची भेट घेणार आहेत. राज ठाकरेंनी हिंदी भाषेच्या सक्तीला आणि त्रिभाषा सूत्राला विरोध केला आहे. पहिलीपासून त्रिभाषा सूत्र राबवून मागच्या दाराने हिंदी लादण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप मनसेकडून करण्यात आला आहे. तसेच राज ठाकरे यांनी सरकार आणि शेळच्या मुख्याध्यापकांनाही इशारा दिला आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ जून २०२५


## शुद्ध पाण्याच्या एटीएम मशीनचे ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते लोकार्पण



**किनगाव राजा (महेश मुंढे) :** ग्रामपंचायत किनगाव राजा यांनी गावात एक आगळावेगळा व कौतुकास्पद उपक्रम राबवून सामाजिक भान जपल्याचे उदाहरण घालून दिले आहे. दक्षिणमुखी हनुमान मंदिर परिसरात शुद्ध पाण्याच्या एटीएम मशीनचे उद्घाटन गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले.व मानाचे फेटे बांधून त्यांचा सत्कार करण्यात आला.या उद्घाटन सोहळ्याला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोणते ही राजकीय व्यक्ती किंवा अधिकारी न बोलावता, गावातील ज्येष्ठ, अनुभवी नागरिकांच्या हस्ते शुद्ध पाण्याच्या ए टी एम मशीन चे उदघाटन करून ग्रामपंचायत किनगाव राजा यांनी आदर्श निर्माण केला आहे.या पाण्याच्या एटीएम मशीन मुळे ग्रामस्थांना आता स्वच्छ आणि शुद्ध पिण्याचे पाणी सहज उपलब्ध होणार असून, त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीनेही सकारात्मक परिणाम होईल. ग्रामपंचायत किनगाव राजा यांचा हा उपक्रम नागरिकांच्या मूलभूत गरजा लक्षात घेऊन राबवण्यात आला असून, त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. सरपंच प्रकाश मुंढे, ग्रामसेवक अमोल मेहेत्रे, उपसरपंच सौ. अर्चना दत्तात्रय झोरे, सखाराम हरकळ, दीपक पडुळकर, संतोष काकड, योगेश चतुर, सदस्य ग्रामपंचायत किनगाव राजा आणि 15 वित्त आयोग व ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नातून हा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत सरपंच व सदस्य ग्रामपंचायत किनगांव राजा यांचे अभिनंदन केले.गावाच्या विकासात नागरिकांचा सहभाग आणि वयोवृद्ध जेष्ठ नागरिकांचा सन्मान याचे उत्तम उदाहरण या उपक्रमातुन पहायला मिळाले.






## श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिरात गुणवंत विद्यार्थ्यांचा उत्साहात गौरव




**शिवनगर, कन्नड (स्वप्नील राठोड) :** श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर, शिवनगर येथे नुकत्याच जाहीर झालेल्या माध्यमिक शालांत परीक्षेत (SSC) उज्ज्वल यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा गौरव समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या सोहळ्याचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष साबुसिंग राठोड यांनी भूषवले. गटशिक्षणाधिकारी मनीष दिवेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर शिक्षणविस्तार अधिकारी बाजीराव ताठे आणि केंद्रीय मुख्याध्यापक दिलीप गायकवाड यांनी विशेष अतिथी म्हणून हजेरी लावली.मनीष दिवेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, “अभ्यास आणि सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे. कठोर परिश्रम आणि शिस्तबद्ध प्रयत्नांद्वारे प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ध्येय साध्य करावे.”या वर्षी चि. वेदांत दिलीप केवट याने ९८.६० टक्के गुण मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. त्याला शाळेतर्फे सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ५,००० रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. तसेच त्याच्या पालकांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.इतर गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. साक्षी अंकुश पवार (९४.००%, ३,००० रुपये), कु. अनुष्का संदीप पवार (९३.८०%, २,००० रुपये), कु. पूर्वी योगेश राठोड (९३.२०%, १,००० रुपये) आणि चि. वेदांत नितीन हारदे (९३.००%, ५०० रुपये) यांचा समावेश होता. याशिवाय २० विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि सन्मानचिन्हे देऊन सन्मानित करण्यात आले. यात आदित्य नलावडे, प्रज्वल चित्ते, तनिष्का खंडेलवाल, वैष्णवी थोरे यांच्यासह इतरांचा समावेश आहे.पालकांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले, “पालक-सन्मान हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या यशात मोलाची भर घालणारा आणि प्रेरणादायी आहे.”कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष रामदास सुरडकर, सचिव पांडुरंग राठोड, सहसचिव संजय पुरी, कोषाध्यक्ष सरलाताई सोनवणे, संचालक मुकुंद शिंदे, शिवाजी वाघ, मुख्याध्यापक प्रकाश जिरेमाळी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या गौरव समारंभाने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला असून, भविष्यातही असेच यश मिळवण्यासाठी ते प्रेरित झाले आहेत.

## संदीप देशपांडेंवर हक्कभंग कारवाई होईल:नरेंद्र भोंडेकर यांची स्पष्टोक्ती

**मुंबई :** विधानसभा अध्यक्षाच्या परवानगीने मनसे नेते संदीप देशपांडे यांच्यावर निश्चितच हक्कभंगाची कारवाई केली जाईल, असे हक्कभंग समितीचे प्रमुख तथा सत्ताधारी शिवसेनेचे भंडाऱ्याचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी स्पष्ट केले आहे. देशपांडे सत्ताधारी नेत्यांना षंढ म्हणत असतील, तर या नेत्यांना भेटणारे राज ठाकरेही षंढ आहेत का? असा सवालही त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

विधिमंडळाच्या एका कार्यक्रमात मराठी भाषेचा बोर्ड नसल्याच्या मुद्यावर रोष व्यक्त करताना संदीप देशपांडे यांनी सोमवारी विधानभवनात षंढ लोक बसल्याची जळजळीत टीका केली होती. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी काही महिन्यांपूर्वी असे विधान केले होते. त्यानंतर त्यांच्यावर हक्कभंग दाखल करण्यात आला होता. आता देशपांडे यांनी त्यांची री ओढल्यामुळे त्यांच्यावरही हक्कभंग दाखल होणार का? असा प्रश्न केला जात आहे. या पार्श्वभूमीवर नरेंद्र भोंडेकर यांनी उपरोक्त स्पष्टीकरण दिले आहे.

नरेंद्र भोंडेकर मंगळवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चांगले संबंध आहेत. आम्ही एकदा नव्हे तर अनेकदा त्यांना या नेत्यांसोबत बसल्याचे पाहिले आहे. एवढे चांगले संबंध असतानाही संदीप देशपांडे अशा शब्दांचा प्रयोग करत असतील तर ते अप्रत्यक्षपणे आपल्याच नेत्यांना असे (षंढ) बोलत आहेत का? असा प्रश्न पडतो. संदीप देशपांडे यांची उंची किती? त्यांनी महाराष्ट्र सरकारचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे योग्य नाही.

महाराष्ट्रात मराठी भाषेचा प्रथम सन्मान व्हावा या त्यांच्या भूमिकेशी आम्ही सहमत आहोत. पण त्यांच्या सरकार विरोधी विधानांमुळे सरकार, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व आमदाराची प्रतिमा मलिन होत आहे. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांच्या परवानगीने निश्चितच त्यांच्यावर हक्कभंगाची कारवाई केली जाईल.

संसदेच्या अंदाज समितीला 75 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त महाराष्ट्राच्या विधानभवनात एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या कार्यक्रमात व्यासपीठावर हिंदी आणि इंग्रजी भाषेत फलक लावण्यात आला होता. त्यावर मराठीचा कोणताही उल्लेख नव्हता. संदीप देशपांडे यांनी यावरून आपला संताप व्यक्त केला होता. 'हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. विधानभवनात सगळे षंढ बसले आहेत. हे पाहून मराठी माणसाने काय करायचे?', असे ते म्हणाले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ जून २०२५


## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किनगाव राजा येथे इयत्ता पहिली प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहात संपन्न





**किनगाव राजा (महेश मुंढे) :** इयत्ता पहिली च्या मुलांची बँडबाजाच्या तालावर गावामधून निघाली वाजतगाजत मिरवणूक मिरवणुकीत सहभागी झाले पालक, शा. व्य. स.अध्यक्ष,सदस्य सुवासिनींनी केले इयत्ता पहिली मधील चिमुकल्यांचे कुंकुम तिलक लावून औक्षणनवागताचे उपस्थित अंगणवाडी सेविका, शिक्षिका यांनी चिमुकल्यांचे औक्षण केले. उपस्थित सरपंच, उपसरपंच, सदस्य, शा.व्य.स.अध्यक्ष, सदस्य, सहा. गट विकास अधिकारी साहेब, अंगणवाडी सेविका, शाळेतील शिक्षिका, हार,पालक,पत्रकार यांनी,गुलाब पुष्प, चॉकलेट, पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट व मोजे देऊन केले नवागतांचे स्वागत. सर्व नवागतांचे घेतले पावलाचे ठसे. सहा.गटविकास अधिकारी महाजन मॅडम यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सर्व उपस्थितांना गोड भाताचे वाटप करण्यात आले. आज दि. 23 जून 2025 रोजी जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची केंद्र शाळा किनगाव राजा ता सिंदखेडराजा जिल्हा बुलढाणा च्या वतीने इयत्ता पहिली च्या मुलांचा प्रवेशोत्सव कार्यक्रम अतिशय थाटात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मुलांना मिष्ठान्न भोजन देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.याप्रसंगी सिंदखेडराजा तालुक्याचे सहा गट विकास अधिकारी माननीय श्रीमती महाजन मॅडम हे निरीक्षक,सरपंच श्री प्रकाश मुंढे ,उप सरपंच अर्चनाताई झोरे,सदस्य सखाराम हरकळ, प्रतिभाताई राजे जाधव अध्यक्ष शिवाजी उबाळे,सदस्य रवी वायाळ,संतोष हरकळ,मीराबाई गवई अंगणवाडी सेविका शीला वलटे ,शीतल जाधव,कांता रणदिवे, सरला काकडे, पत्रकार फिरोज शेख,इसाक शेख,विलास झोरे,सचिन राजे, मुख्याध्यापक श्री प्रफुल्ल घीके, कु. संगीता काकड मीरा पवार, शिवशंकर डोईफोडे म्हणून पूर्णवेळ उपस्थित होते. त्यांच्या हस्ते इयत्ता पहिली मधील पंचवीस मुलांना पुष्पहार,गुलाबपुष्प , चॉकलेट, पाठ्यपुस्तके देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष तथा सर्व सन्माननीय सदस्य उपस्थित होते.तसेच माननीय सरपंच श्री प्रकाश मुंढे सौ अर्चनाताई झोरे उपसरपंच तसेच सर्व सन्माननीय ग्रामपंचायत सदस्य सखारामजी हरकळ, प्रतिभाताई राजे जाधव व पत्रकार बांधव श्री फिरोज शेख, इसाक शेख, सचिन राजे, विलास झोरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.. कार्यक्रमाला गावकरी मंडळी ,पालक, व इतर उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.






## अजित पवारांच्या खात्याकडे लक्ष ठेवा:निधी कुठे वितरित होतो याची माहिती घ्या — एकनाथ शिंदे



**मुंबई :** अजित पवारांच्या खात्याकडे मोठा निधी आहे, त्यावर लक्ष ठेवा. तो निधी कुठे वितरित होतो याची माहिती घ्या, असा आदेश राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांना दिला असल्याची माहिती आहे. मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांची वेगळी बैठक घेतली. यात निधी वाटपावरून शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली असल्याची माहिती आहे.

अजित पवार निधी देत नाहीत, अशी तक्रार शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांनी अनेकवेळा बोलून दाखवली आहे. मंत्री संजय शिरसाट यांनी देखील थेट आरोप केले होते. त्यामुळे निधी वाटपाच्या मुद्द्यावरून महायुतीमधील तिन्ही घटक पक्षांमध्ये धुसफूस असल्याचे दिसून येते. याच पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर त्यांच्या पक्षाच्या मंत्र्यांसोबत वेगळी बैठक घेतली असल्याचे समजते.

एकनाथ शिंदे निधी वाटपावरून आक्रमक झाल्याचे देखील पाहायला मिळाले. अजित पवार यांच्या खात्यावर लक्ष ठेवण्याचे आदेश शिंदेंनी आपल्या मंत्र्यांना दिले आहेत. अजित पवारांच्या खात्यात 14-14 हजार कोटींचे दोन निधी आहेत. त्यावर लक्ष ठेवले पाहिजे. हा निधी कुठे वितरीत होतो याची माहिती आपल्याला मिळाली पाहिजे असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. दरम्यान, राज्यात निधी वाटपाच्या मुद्द्यावरून शिंदे गटाच्या मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी अजित पवारांची भेट घेतली होती. त्यापूर्वी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी देखील पवारांची भेट घेतली होती. या भेटीत निधी वाटपावर चर्चा झाल्याची माहिती आहे.

शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांनी अजित पवारांकडून निधी मिळत नसल्याची तक्रार करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यानंतर निधी हा काही आपल्या खिशातून देत नाही, राज्यातील तिजोरीला शिस्त आणण्यासाठी काही पावले उचलली जातात असे अजित पवारांनी स्पष्ट केले होते. अजित पवारांच्या निधी वाटपावर केवळ शिंदे गटच नव्हे तर भाजपच्या आमदारांनी देखील नाराजी व्यक्त केली होती. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा नांदेडच्या दौऱ्यावर असताना भाजपच्या आमदारांनी मंचावर उपस्थित असतानाच तक्रार केली होती.

## अजित पवारांचा उद्धव ठाकरे यांना झटका : महादेव बाबर राष्ट्रवादीत करणार प्रवेश



**पुणे :** शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाचे माजी आमदार महादेव बाबर यांनी सोमवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची घोषणा केली. ते दस्तुरखुद्द अजित पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर बाबर यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी दिल्यामुळे उद्धव ठाकरे यांना पुण्यात जोरदार झटका बसला आहे.

महादेव बाबर हे ठाकरे गटाकडून हडपसर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज होते. या नाराजीतूनच त्यांनी ठाकरे गटाला जय महाराष्ट्र केला. सुरूवातीला बाबर कोणत्या पक्षात जाणार? याविषयी अनेक अटकळी व्यक्त केल्या जात होत्या. पण आज अखेर त्यांनी स्वतःच आपण सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाणार असल्याचे स्पष्ट केले. ते आज अजित पवारांच्या उपस्थितीत मुंबईत राष्ट्रवादीत प्रवेश करतील. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे राष्ट्रवादीतील पुण्यातील ताकद वाढणार आहे.

मी पूर्वीपासूनच अजित पवार यांच्या काम करण्याच्या पद्धतीचा चाहता आहे. त्यातच सध्या त्यांची सत्ताही आहे. त्यामुळे विकासाचे मार्ग मोकळे आहेत. त्यामुळे मी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देत अजित पवारांच्या पक्षात जाण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्या परिसराचा विकास हाच माझा अजेंडा आहे. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही मी चांगले काम करून दाखवेल, असे महादेव बाबर आपल्या पक्षप्रवेशाविषयी बोलताना म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ जून २०२५


## कालिकादेवी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे यांचा भव्य सत्कार व परिचय



**शिरूर (का.) प्रतिनीधी :** २४ जून २०२५ वार मंगळवार रोजी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बदली होऊन आलेले सन्माननीय मुख्याध्यापक तथा प्राचार्य मा. केशव भांगे साहेब यांचे शिरूर कासार येथे विविध मान्यवरांच्या वतीने तसेच अनेक प्रतिष्ठित नागरिक,पदाधिकारी,नगरसेवक ,जेष्ठ कार्यकर्ते यांच्या वतीने गेल्या १४ जून पासून मोठ्या प्रमाणात स्वागत व सत्कार होत आहेत.सत्काराचे हे पर्व आजपर्यंत सुरूच आहे.उन्हाळ्याच्या दीर्घ सुट्यानंतर शाळा/विद्यालय नियमित सुरू झाले आहे. इ.११ वीचा वर्ग वगळता इ.५ वी ते १२ वी पर्यंत (कला,विज्ञान व वाणिज्य) च्या तासिका नियमित सुरू झाल्या आहेत.तेव्हा बदली होऊन आलेले नवे मुख्याद्यापक तथा प्राचार्य यांचा परिचय सर्व विद्यार्थ्यांना व्हावा म्हणून विद्यालयात, प्राचार्य केशव भांगे साहेबच्या "परिचयचा व स्वागताचा" भव्य कार्यक्रम घेण्यात आला. प्रथम प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने व पर्यवेक्षक जे.एम. काळे सर यांच्या हस्ते, बीड जिल्ह्याच्या लोकनेत्या स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर व स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यानंतर प्राचार्य केशव भांगे साहेबांचा विद्यालयाच्या वतीने परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, प्रा.दत्ता गायकवाड ,बाळासाहेब येवले,व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आत्माराम झिंजुर्डे,प्रा.विनोद गलांडे,जयेंद्र निकम,प्रा.सविता दराडे,सौ.अनिता लाटे मॅडम यांच्या वतीने शाल,पुष्पहार,श्रीफळ व "भारताचे संविधान" हा सर्वोच्च ग्रंथ देऊन भव्य सत्कार करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थी प्रतिनीधी कु.मधुरा नेटके,चि.शोयब आतार, कु.आर्या ढाकणे, चि.आदित्य मोरे, यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.प्रा.विनोद गलांडे यांनी प्राचार्य केशव भांगे साहेबांचा,प्रशासकीय, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक अनुभव आणि योगदानाबद्दलचा सविस्तर असा परिचय करून दिला. प्रास्ताविकपर भाषणातून प्रा.बसवेश्व देशमाने सरांनी विद्यालयाचा आतापर्यंतच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा मांडला.शिक्षक प्रतीनिधी म्हणून डॉ.आत्माराम झिंजुर्डे यांनी मनोगत व्यक्त केले.त्यानंतर सन्माननीय प्राचार्य केशव भांगे साहेबांनी मार्गदर्शनपर भाषणातून सांगितले की, शिरूर कासारकरांच्या वतीने स्वागत,आदर आणि सत्काराने मी भारावून गेलो.एवढ्या मोठ्या प्रमाणात माझा सत्कार झाला नाही.हे केवळ आमच्या सर्वांच्या भाग्यविध्यात्या स्व.काकू व माजी मंत्री आदरनीय,मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब यांच्यामुळेच हा मान-सन्मान मला मिळाला.त्यामुळे मी धन्य झालो. साहेबांनी माझ्यावर जो विश्वास व जबाबदारी टाकली तिला सार्थकी लावण्याचं काम माझं आहे.ते मी स्त:ला झोकून देऊन बुध्दीचातुर्याने,तनमनाने व सदसद विवेक बुध्दीने करणार आहे.तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन प्रगतीसाठी कटिबद्ध राहणार आहे. विध्यार्थ्यांनो तुम्हाला कोणतीही अडचण आली तर,मला प्रत्यक्ष सांगा,ती अडचण तात्काळ सोडविली जाईल.असा विद्यार्थ्यांना दिलासा ही दिला. यावेळी प्रा.महारूद्र डोंगरे, प्रा.नामदेव तरकसे, प्रा.संजय काकडे, प्रा.अशोक इनकर,प्रा.संजय आव्हाड, प्रा.अनिल जरे, प्रा. प्रशांत मळेकर, प्रा.नारायण घोलप, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.महादेव हांगे,प्रा.नारायण तांबे, प्रा.लक्ष्मण गव्हाणे, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.दत्ता शिंदे, डॉ.सत्यनारायण ढवळे, डॉ.अशोक घोडके,प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.अशोक सवासे, प्रा.शशिकांत जावळे,प्रा.हनुमंत घायाळ, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.अक्षय रणखांब, प्रा.अमर खोले. प्रा.रेखा निर्मळ,प्रा.सिमा ढवळे, रविंद्र बडे,सुर्यकांत नेटके, आबासाहेब ढवळे,वसंत आहेर,बाळासाहेब येवले,राजू बडे,आप्पासाहेब कांबळे,नितीन बहिर,रोहित शिराळे, रविंद्र गव्हाणे,सुंदर शिंदे, आदिनाथ काशिद,सुनिल खेडकर,धनंजय बिक्कड,विलास कांबळे, दत्ता शिंदे,श्रीमती कुसुमबाई ढिसले,इत्यादिंनी सहकार्य केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गलांडे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन माध्यमिकचे सांस्कृतिक विभाग प्रमुख, जयेंद्र निकम यांनी मानले,या प्रसंगी विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मागणी नसताना शक्तिपीठ महामार्गाचा हट्ट का?: काँग्रेस नेते सतेज पाटलांचा सरकारला सवाल



**कोल्हापूर :** शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी कोल्हापूरमधील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केल्यानंतर ही प्रक्रिया तात्पुरती थांबवण्यात आली होती. मात्र, आता सरकारने पुन्हा भूसंपादन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. रत्नागिरी नागपूर महामार्ग असताना अन् कुणाची मागणी नसताना शक्तिपीठचा हट्टा का? असा सवाल काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी केला आहे. तर शक्तिपीठ कदापि होऊ देणार नाही, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी सरकारला दिला आहे.

सुमारे 86 हजार कोटींचा खर्च अपेक्षित असलेला हा महामार्ग राज्यातील 12 जिल्ह्यांतून जाणार आहे. शक्तिपीठ महामार्ग हा सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट असला, तरी शेतकऱ्यांचा भूसंपादनाला मोठा विरोध आहे. काँग्रेस नेते सतेज पाटील आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी या निर्णयाविरोधात तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत, संघर्ष अधिक तीव्र करणार असल्याचा सरकारला इशारा दिला आहे.

गरज नसलेला महामार्ग करु नये, अशी आमची लोकसभेच्या अगोदरपासून मागणी आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेऊन कारण नसताना महामार्ग केला जातोय, असे सतेज पाटील म्हणाले. रत्नागिरी नागपूर महामार्ग असताना या मार्गाचा आग्रह शासन का करत आहे? हे माहिती नाही. त्याऐवजी शक्तिपीठे आहेत तिथे निधी द्यावा. 86 हजार कोटींचा खर्च करण्याऐवजी कंत्राटदारांची 84 हजार कोटींची बिले द्यावीत. महाराष्ट्रातील अनेक रस्ते खराब झालेले आहेत त्याला निधी द्यावा. राज्य अगोदर कर्जात असताना 86 हजार कोटींचा बोजा सरकार का घेत आहे, हे कळत नाही. शक्तिपीठ करण्याचा हट्ट का करण्यात येतोय? असा सवाल सतेज पाटील यांनी केला आहे.

एक दोन लोकांची मान्यता घेऊन हा महामार्ग सगळ्यांनाच मान्य आहे हे करणे चुकीचे आहे. या रस्त्याने सामान्य माणसाचा काही फायदा होणार नाही. आम्ही 12 जिल्ह्यातील शेतकरी सातत्याने संपर्कात आहोत. रत्नागिरी-नागपूर महामार्गात अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत. परभणीत गेले होतो तिथल्या कुटुंबांच्या 25 ते 30 एकर जमिनी गेलेल्या आहेत. या रस्त्याची गरज नाही आमची आंदोलनाची भूमिका उद्याच्या भविष्य काळात तीव्र राहील, असा इशाराही सतेज पाटील यांनी सरकारला दिला आहे.

महाराष्ट्रात अनेक राष्ट्रीय महामार्ग झाले त्याला लोकांचा विरोध झालेला नाही. रत्नागिरी - कोल्हापूर- नागपूर महामार्ग, पुणे मुंबई एक्स्प्रेस वे, पुणे कोल्हापूर सहापदरीकरण अशा महामार्गांना लोकांनी विरोध केलेला नाही. कोल्हापूर आणि सांगलीमध्ये पुराचे संकट आहे. शेतकरी भूमिहीन होणार आहेत. या मार्गाची गरज अजिबात नाही, असेही सतेज पाटील म्हणाले.







महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ जून २०२५

# विठूमाऊली की विठोबा - साक्षात विठ्ठलाशी साक्षेपी संवाद




कवीवर्य शब्द स्नेही सन्मित्र गणेश भाकरे यांनी धादान्तविठ्ठलाशी संवाद केला आहे. 'महाराष्ट्रातल्या कुणब्यांचा विठोबा पंढरीत उभा आहे विटेवर पण माझा विठोबा माझ्यातून दुर गेला.ज्यांनी आयुष्याची माती करून माझ्या आयुष्याचं सोनं करायचा प्रयत्न केला शेवटच्या श्वासापर्यंत तो माझा विठोबा म्हणजे माझे वडील माझे नाना'.बेलुरा बुद्रुक व अंत्री (मलकापूर) येथील कुणबाऊ शेतकरी कष्टकरी मजुरांची होरपळ उघड्या डोळ्यांनी अनुभवली ती तमाम माय मातीची माणसं.अर्पण पत्रिका,अतिशय आशय संपन्न सृजनशील भावनेचा आदर आहे."देशाच्या सीमेवर आणि वावराच्या बांधावर आयुष्य काढणाऱ्या माझ्या वीर बांधवांना "मनस्वी आहे.ही कविता माय मातीच्या निष्ठेची आरती गाते.तर कुणबाऊ मनाचा तळ ढवळून काढते.एक निश्चल निर्मळ, नितळ भाव हा या कवितेचा विषय आशय झाली.साहित्यिक म्हणून श्रध्देय कवी प्रशांत असनारे यांच्या अक्षर वाटेवरची ऋणाई कायम सहृदयी आहे.असे ऋण व्यक्त करीत विठूमाऊली की विठोबा! गणेश भाकरे यांची नखशिखांत ही शेतकऱ्यांच्या हलाखीच्या जगण्याचे चित्रण चिंतन स्वरूपात प्रकट करणारी ही अतिशय लक्षवेधी कविता आहे.मलपृष्टावर कवी लिहितो मला विश्वास आहे "माझ्या संग्रहातील प्रत्येक कविता ज्यांनी वाचून काढली.प्रत्येक कविता आलटून पालटून वाचतात ते पण सांगत नाहीत किंवा बोलत नाहीत कुण्या विचार पीठावरून त्या कवितेचा दर्जा किती जबरदस्त आहे.मी अहो तो पर्यंत ते नक्कीच बोलणार नाहीत माझ्या कवितेवर अन् माझ्यावर.मी नसेल इथं तिथं त्यावेळेस सांगतील जगाला माझं आणि माझ्या कवितेचं महत्त्व.एवढा मात्र नक्कीच विश्वास आहे मला त्यांच्यावर" हा अद्मम्य विश्वास जेव्हा कवीला येतो तेंव्हा ती शब्दांकित प्रतिभेची साधना आहे.कवी गणेश भाकरे यांच्या मनोगताचा अनुबंध पाहिला तर अखंड शब्द अक्षरांची ज्योत.महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मितीचे किशोर मासिकात सलग एकोन्तीस महिने बालकविता प्रकाशित झाल्या.'प्रकाशाचा दिवा'हा किशोरचा शैक्षणिक साहित्यिक म्हणून गौरवांकित नोंद आहे.याचा सार्थ अभिमान आपणांस असला पाहिजे.आहेच.मराठी साहित्यांचा वाड्मयीन साहित्यिकांचा यत्किंचितही वारसा काय तर आरसा सुध्दा नाही.शालेय अभ्यासात जे वाचनिय संस्कार झाले आहे या शिदोरीवरच चार कविता संग्रह.या वाड्मयीन काव्यसंग्रहाला चौदा चौदाव्या रत्ना सारखे नामांकित संस्थेचे सन्मानाचे पुरस्कार मिळाले आहेत.'आसवांची शाई' या कवितेने समग्र वाड्मयीन नियतकालिकात दिपावली अंकात गणेश भाकरे यांच्या कवितेची दर्जेदार दखल घेतली आहे.मंदिराच्या भिंतीवर अभंग कवितांची अधोरेखित नोंद घेतली आहे.प्रस्तूत कवितेचा मर्मग्राही आस्वाद असा आहेगावशिव सोडतांना डोळ्यात आसवे दाटून येतात.माय रमत नाही शहरात तिचा जीव लागतं नाही गावा शिवाय.(दाणे टाकत होती पाखरांना)या कवितेचा आशय आजच्या समकालीन गाव खेड्यातील मायीचे चित्रण आहे ही कविता अतिशय उत्तम अंभग वृत्तात व अष्ठाक्षरी,मुक्त छंदात असल्याने गेय लयीने लक्षवेधी झाली आहे.जसेगावातील मित्रचं आज नाही त्याची आठवण व्याकूळ करते."भेट कुणाची मी घेऊ सांग गावी आल्यावर पाय ठेऊ तरी कसा आता तुझ्या दारावर मित्रा!होता तूच खरा तुच सांभाळली व्यथातुझ्यामुळे तरंगली माझ्या आयुष्याची गाथा "(ओठी नव्हतेच शब्द) ज्या मायभूमीत जन्मलो ज्या गावांमध्ये लहानपणीचा खेळ मांडला तो खेळ आता गावं नव्याने खेळतो आहे.गावाचा खुळखुळा केला आहे.लबाडाच्या हाती सत्ता,वेशीचा लिलाव, लाखांचा धनादेश, प्रचाराचा झेंडा,लाचार होऊन जगणे गावठाण गावगाडा शतकानंतर "लुटतात तेच चाटतात तेच,तुझा कोण पेच सोडवेल"..या राजकीय डावपेचाच्या मेचकीत अडकले गाव.आजच्यासभोवतालचा कुणबी शेतीनिष्ठ शेतकरी यांच्या अपार कष्टाचे होणारे हल बेहाल पाहून कवी विठोबाला आपल्या सृजनशील भावनेतून आर्त हाक या कवितेतून देतो."माझा बाप दिवसरात्र राबत असतो शेतात अनवाणी.सांजवेळी गात असतो पारावर तुझ्यासाठी अभंग.विठूमाऊली,तालासुरात गात गात नाचत तोच येतो दरवर्षी तुझ्या भेटीला तुझ्या पंढरीत.तू म्हणजे त्याची माऊली! पण माझ्या माऊलीसारखं.तुला कसं कळत नाही त्याचं दु:ख? विठूमाऊली की विठोबा...!"(विठूमाऊली की विठोबा) या कवितेची स्वतंत्र बलस्थाने आहेत.अभंगरचना हा प्रकार जाणीव पूर्वक विठोबा गुरुमाऊलीचे अधिष्ठान म्हणजे पंढरीचा वावरातला कुणबी वारकरी.ही कविता कोरडा कळवळा व्यक्त करीत नाही ती कुणब्यांच्या वखराचं रुमणं काढून प्रश्नांच्या मानगुटीवर बसते.शहरात राहून शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनांवर कविता लिहिणाऱ्या भामट्या कवीची प्रतिभा हा कवी टेपारून काढतो.जसे"तो कवी लॅपटॉपवर बैलगाडी,डवरा,वखर,तिफणीचे चित्र दाखवत म्हणाले,"अहो यात रुमणं कुठे वापरतात ते कसं असते अन् त्याचं महत्त्व काय?"हे एकूण मी हातात रूमणंआणलं असतं तर बर झालं असतं"(पृ.२८).ही अस्सल गावखेड्याच्या गाव शिवाराची दहाकता मांडणारी कविता आहे.या कवितेचा मर्मग्राही आस्वाद म्हणजे आत्मिक भाव घेऊन माझा विठोबा माझी पंढरी हे रान शिवार,गावगाडा,गावातील जीवाभावाची मायाळू माणसं मला जपायची.पण ही ह्दयांकित माणसं माणुसकीला पारखी झाली आहे.मनभरून येते पण इथे ती आता गवसत नाही हे सारेच हरवले आहे.ज्या ग्रामीण भागात विठू माऊलीचा गजर जयघोष होतो त्या विठोबा माऊलीशी हा संवाद या कवितेचा आहे."थोडा करूनतर बघ संवाद तुझ्या आवडत्या पांडुरंगाशी.ऑनलाईन;फक्त करू नको संवाद आढ्यावर लपुन बसलेल्या यमराजाशी.ऑनलाईन"!!!...(पृ.२५) गणेश भाकरे यांच्या कवितेची सृजन समर्पक विवेचक मांडणी अशी,तुका दिसला का,अन् मी इंद्रायणी काठी,सांग विठोबाला,देव कुणब्याचा,बाप बांधावर,कुटू देणं टाळ,विठूमाउली की, विठोबा!माझा पांडुरंग,या आत्मरंगी कवितेचा अनुबंध म्हणजे शेतकरी कष्टकरी माय मातीच्या हळव्या हका आहेत.तूच तारणहार आहेस. दु:ख सांगितल्याने हलके होते."अरे, ज्यांना मी सर्वस्व दिलं त्यांनीचमला वाऱ्यावर सोडलं.ज्यांना मी काहीच दिलं नाही, त्यांनी मला सारं काही दिलं ते फक्त माझ्या कवितेमुळे.."(पृ.३०)कवितेची निस्सीम भक्ती काय असते असं सांगणारी कवीची कविता जे शब्दांनी मोठे झाले ज्यांना आधार दिला ती विसरून गेली.तुमची कविता वाचून डोळे भरून आले, तुमच्या कवितेचं बोट धरून मीही कविता लिहितो.फक्त ऋण व्यक्त करावेत व नतमस्तक व्हावे म्हणून आलो.खरचं कवी स्नेही गणेश भाकरे जी ही कृतज्ञतेची भाव व्याकुळ करणारी कविता डोळे चिंब करून जाते.सुख शोधताना,जीवनाचा आनंद स्वानंद होतांना हा कवी प्रचंड आत्मिक सृजनशीलता जोपासून आहे.रेमण्ड लिमिटेड छिंदवाडा डिव्हीजन (म.प्र.)या नामांकित कंपनीत नोकरी आहे.इथले सारे स्नेहाळू सन्मित्र त्यांच्या कवितेला आपला माणूस मानतात ही सविनय भावना त्यांच्या कवितेची श्रीमंती आहे.जसे,"कुण्या लेकरानं असं इथे करू नये पाप,पांडुरंगा सारखेच घरी ठेवा मायबाप...मायबापापेक्षा नाही संसारात मोठे,वय झालं म्हणूनिया त्यांना मारू नये गोटे!"(पृ.१७)अतिशय आशय संपन्न भाव व्याकुळता आणि सामाजिक काव्य परिप्रेक्ष्यातून ही कविता दमदार आशय देऊन जाते हाच या कवितेचा आशय अनुबंध आहे.गावं गावातीलपिढ्यानपिढ्यांची माणूसकी रत माणसं आज भेटतं नाही.ज्या गावपांढरीच्या अंगाखांद्यावर बालपण गेलं विठ्ठला हेतू आज काय केलं..वारी वारकरी,टाळ मृदंगाची निनाद फैरी.जावे पंढरीच्या या नगरी."दु:ख पाहुनिया त्याचं डोळा दाटूनिया येतेकुणब्याचं घरदार गाणं अभंगाचे गाते!काही झालं तरी तुला जोडतो रे हातकरु नको पांडुरंगा माझ्या कुणब्याचा घात"(पृ.६८)ही अतिशय लक्षवेधी प्रार्थना ही कविता करून जाते.साक्षात पंढरपूरीचा पांडुरंग विठ्ठलाशी ही कविता आर्त हाक तर देतेचं पण अमोघ भक्तीच्या हक्काने मागणी करतेकाय सांगू तुला?,काय म्हणू तुला? आपुलकीच्या भावनेनं ही कविता संयत मनोभूमिका मांडते.बालपणात मी रडलो की,आई मायेनं पदरा आड घेयाची.बाप दिवसरात्र अनवाणी शेतात राबतो.आणि संध्याकाळी पारावर विठ्ठलासाठी अभंगात टाळ कुटीत रहातो.विठूमाउली म्हणतं दरवर्षी पंढरीच्या वारीला जातो.तरी ही कुणब्यांच्या दु:खाचा वाटेकरी तू का होतं नाहीसं विठ्ठला.म्हणून"पण माझ्या माऊली सारखं तुला कसं कळत नाही त्यांचं दु:ख?तूच सांग विठोबा,तूला काय म्हणून विठूमाउली की विठोबा...!"(पृ.५५) अशी ही अद्मम्य विश्वास, श्रध्दा, सोसल्या भोगल्याची सखेद भावना व्यक्त करते.मनाचा हा कोंडमारा सांगाळून सांगने म्हणजे ही कुणबाऊ मनाचो व्याकूळ कविता आहे.कवीवर्य गणेश भाकरे ही कवितेच्या निस्सीम भक्तीचे वारकरी आहेत.त्यांना जय जय पांडुरंग हरी माऊली.मनस्वी शुभेच्छा.

**विठूमाउली की विठोबा! (काव्यसंग्रह)**
**कवी - गणेश भाकरे**
**प्रकाशन - शब्ददीप प्रकाशन,**
**मूर्तिजापूर, जि. अकोला.**
**प्रथमावृती :-२४/११/२०२३**
**मुखपृष्ठ:-अरविंद शेलार**
**मूल्य -:-१७०**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके**
**जालना संवाद:-९९ ७५ १३ ७३ ३७**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002